# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०१/२०२६ (शनिवार )**

---

## मा.श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तक्रार निवारण जनसभा घेवुन नागरिकांसोबत साधला सुसंवाद नागरिकांच्या समस्यांचे केले निवारण

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन मौदा आणि पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत नागरिकांच्या अडचणी जाणुन घेण्यासाठी तक्रार निवारण जनसभा घेवुन नागरिकांसोबत संवाद साधाला.**

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १४/०१/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन मौदा येथे तक्रार निवारण जनसभा घेवुन नागरिकांसोबत सुसंवाद साधुन त्यांच्या अडी—आडचणी आणि तक्रारी जाणुन घेतल्या. उपस्थित नागरिकांनी मनमोकळे पणाने मा. पोलीस अधिक्षकांसोबत संवाद साधुन स्वत:च्या अडचणी त्यांच्या समोर मांडल्या. मा. पोलीस अधिक्षकांनी तात्काळ जन सामन्यांच्या अडचणी जाणुन त्या सोडविल्या. तसेच लवकारात लवकर जन सामन्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत संबधितांना आदेशीत केले. नमुद सभेत १०० ते १५० जनसमुदाय हजर होता. सदर सभेला श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री सारीत दुर्गे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा आणि पोलीस स्टेशन मौदा चे अधिकारी/अंमलदार हजर होते.







पोलीस स्टेशन पारशिवणी :— दिनांक १६/०१/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत **अत्यंत दुर्गम भागात असलेल्या कोलीतमारा गावात तक्रार निवारण जनसभा घेवुन नागरिकांसोबत सुसंवाद साधुन त्यांच्या अडी—आडचणी आणि तक्रारी जाणुन घेतल्या.** मा. पोलीस अधिक्षकांनी तात्काळ जन सामन्यांच्या अडचणी जाणुन त्या सोडविल्या. उपस्थित नागरिकांनी मनमोकळे पणाने मा. पोलीस अधिक्षकांशी संवाद साधुन स्वत:च्या अडचणी त्यांच्या समोर मांडल्या. मा. पोलीस अधिक्षकांनी लवकारात लवकर जन सामन्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत संबधितांना आदेशीत केले. **सदर कार्यक्रमात शाळकरी विदयार्थ्यांनी आदीवासी नृत्य सादर केले. मा. पोलीस अधिक्षकांनी त्यांचे कौतुक केले.** नमुद कार्यक्रमात १०० ते १५० जनसमुदाय हजर होता. सदर कार्यक्रमात श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवणी आणि पोलीस स्टेशन पारशिवणीचे अधिकारी/अंमलदार हजर होते. **तसेच सदर कार्यक्रमाला पारशिवणी पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील सुध्दा हजर होते. मा. पोलीस अधिक्षकांनी हजर असलेल्या पोलीस पाटलांच्या सुध्दा समस्या जाणुन घेतल्या तसेच त्यांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.**


पोलीस स्टेशन पारशिवनी
नागपूर ग्रामीण पोलीस
वार्षिक निरीक्षण
कोलितमारा
योग प्रशिक्षण शिबीर






## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपी विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :– दिनांक १६/०१/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना **आरोपी नामे आशीष प्रकाशजी नारनवरे, वय ३२ वर्ष, रा. थुगावदेव ता.नरखेड,** हा मौजा जलालखेडा ते नारसिंगी रोड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १७/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७२५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३७ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने